# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक तात्काळ/फॅक्स**

क्रमांक-रानिआ-२००५/प्र.क्र.३४/का-०७,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ०५/०९/२००५

प्रति,
जिल्हाधिकारी,
रत्नागिरी, रायगड, जळगांव, औरंगाबाद, नांदेड,
बीड, आकोला, अहमदनगर, सोलापूर, गडचिरोली,
यवतमाळ, ठाणे, चंद्रपूर.

विषय:- जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील रिक्त पदांच्या
पोटनिवडणुका- ऑक्टोंबर २००५

सोबत अनुसूचि-१ मध्ये नमुद केलेल्या जिल्हा परिषद सदस्यांची पदे व अनुसुचि-२ मध्ये नमुद केलेल्या पंचायत समिती सदस्यांची पदे रिक्त झाल्याचे अहवाल राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झाले आहेत. या रिक्त जागांच्या पोटनिवडणुका घेण्यासाठी सोबत जोडलेल्या अनुसुचि-३ मध्ये पोटनिवडणुकीचा कार्यक्रम देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १३(१) आणि ५८(१अ) मधील तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयुक्त अधिसूचित करतील अशा तारखेस अस्तित्वात असलेली संबंधित क्षेत्राची विधानसभा मतदार यादी गट/गणामध्ये विभागून पोटनिवडणुकीसाठी छापून घेऊन अधिप्रमाणित करणे आवश्यक आहे. या प्रयोजनासाठी दिनांक- ०९/०९/२००५ ही तारीख अधिसूचित करण्यात आली आहे. सदर तारीख अधिसूचित करण्यासंदर्भातील मा. राज्य निवडणूक आयुक्तांचे क्रमांक/मनपा/२००५/प्र.क्र.३/का-५, दिनांक २४/०८/२००५ ची अधिसूचना निर्गमीत केली असून सदर अधिसूचना दिनांक २६/०८/२००५ चे शासन राजपत्रात भाग एक अ पृष्ठ क्र.३३७ वर प्रसिध्द झाली आहे.

३. मतदार गट/गणनिहाय मतदार यादया अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित मतदार गट /गणामधील मतदारांच्या (नागरिकांच्या)माहितीसाठी दिनांक- १६/०९/२००५ रोजी प्रसिध्द करण्यात याव्यात. या यादीमध्ये लेखनिकांच्या चुका किंवा दुस-या मतदार गट/गणातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असल्यास अथवा अधिसूचित केलेल्या तारखेस विधानसभा मतदार यादीत नावे असूनही ज्यांची नांवे चुकून मतदार गट/गणनिहाय मतदार यादीत समाविष्ट करावयाची राहून गेली असल्यास, अथवा वगळण्यात आलेल्या मतदारांची नावे यादीमध्ये वगळलेली नसल्यास त्यांची नांवे पुरवणी यादीद्वारे समाविष्ट करावीत अथवा वगळावीत. याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी किंवा त्यांनी या निवडणुकीसाठी अथवा मतदार यादी तयार करण्यासाठी आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी सदर दुरुस्त्या अत्यंत काळजीपूर्वक कराव्यात. त्यानंतर मतदार यादी छापून दिनांक- दि.२३/०९/२००५ रोजी अधिप्रमाणित करण्यात यावी, आणि ती मतदारांची अधिप्रमाणित यादी अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात यावी.

४. या निवडणुकीत मतपेटया वापरण्याबाबत भारत निवडणूक आयोगाची मंजूरी मिळविण्यासाठी किती मतपेटया लागतील याची मागणी व इतर निवडणूक साहित्याची मागणी मुख्य

निवडणूक अधिकारी तथा सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबईः- ४०० ०३२ यांच्याकडे पुरेशी आधी पाठवावी. निवडणूक साहित्य व इतर साहित्य उधारीच्या तत्वावर देण्याचे अधिकार भारत निवडणूक आयोगाने त्यांच्या पत्र क्रमांक-५२/२/९८/(पी)/पीएलएन/चार, दिनांक- २७/४/१९९८ नुसार मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे दिलेले आहेत.

५. हे पत्र निर्गमित होण्याच्या तारखेपासून ज्या मतदार गट/गणाकरिता पोट निवडणूक घ्यायची आहे त्या मतदार गट/गणाच्या क्षेत्रात निवडणूक आचारसंहिता अंमलात येईल. आचारसंहितेमधील तरतुदीचे सर्वतोपरी पालन होईल याची संबंधितांनी दक्षता घ्यावी. पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता अंमलात राहील. या पोटनिवडणुकीकरिता आचारसंहिता जरी संबंधित मतदार गट/गणाच्या क्षेत्रात अंमलात आली असली तरी निवडणूक असलेल्या गट/गणातील मतदारांवर प्रभाव पडेल, अशा त-हेचे कोणतेही धोरणात्मक निर्णय घ्यावयाचे झाल्यास त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे संदर्भ करण्यात यावा. सध्या सुरु असलेली कामे न थांबविता पूर्ण करण्यात यावीत. आचारसंहितेसंदर्भात कोणतीही शंका असल्यास जिल्हाधिकारी यांच्या अभिप्रायासह राज्य निवडणूक आयोगाकडून माहिती करुन घेण्यात यावी.

६. जिल्हा परिषद/पंचायत समिती क्षेत्रांतील पूर परिस्थिती व साथीचे रोग यांच्यावर उपाय योजना करणे इत्यादी संदर्भातील कोणत्याही कामकाजास आचारसंहितेची बाधा असणार नाही मात्र यासंदर्भात होणाऱ्या कार्यक्रमात मंत्री, खासदार, आमदार, व इतर जिल्हा परिषद सदस्य /पंचायत समिती सदस्य व पदाधिकारी यांचा सहभाग रहाणार नाही व आचारसंहितेच्या कालावधीत कोणत्याही प्रकारचा उदघाटनाचा, भुमिपूजनाचा कार्यक्रम होणार नाही याची काळजी घ्यावी. आवश्यकता असल्यास पूर परिस्थिती व साथीचे रोग यांच्या उपाययोजनेत समन्वय असावा यासाठी संबंधित जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तसेच राज्य शासनाचे विशेष अधिकारी म्हणून केली असल्यास त्या अधिकाऱ्याचा व अन्य आवश्यक अधिकाराचा त्यामध्ये समावेश असू शकतो.

७. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.२९/का-१०, दिनांक- १२/७/२००१ अन्वये विहित केल्यानुसार उमेदवारांना दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याबाबत शपथपत्र तसेच आदेश क्रमांक-एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/का-०५, दिनांक- १५/३/२००४ अन्वये उमेदवारांकडे अथवा त्यांच्यावर अवलंबून असणा-या व्यक्तींकडे किती संपत्ती आहे व उमेदवारांवर कुठलाही अपराध केल्याचा आरोप आहे काय, त्याची शैक्षणिक पात्रता काय आहे इत्यादीबाबतची शपथपत्रे विहित नमुन्यांत करणे बंधनकारक आहे. सर्व निवडणूक निर्णय अधिका-यांना शपथपत्रांचे नमुने नामनिर्देशनपत्रासोबत उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच शपथपत्रे नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिका-यांकडे सुपूर्द करणे आवश्यक आहे.

८. निवडणूकांचे वेळी उमेदवार अर्ज भरतांना अनेक उमेदवार अर्ज भरतात परंतू नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या वेळी एक उमेदवार सोडून अन्य सर्व उमेदवार अर्ज मागे घेतात. अशा वेळी तो उमेदवार इतर उमेदवारांवर दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावतो ही शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे या पुढे असे प्रसंग घडल्यास राज्य निवडणूक आयोगास त्याबाबत सविस्तर अहवाल तात्काळ पाठवावा. व राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करावे असे आदेश रानिआ/मनपा २००४/प्र.क्र.३७/का-५ ,दि. २३/१२/२००४ अन्वये दिलेले आहेत त्याचे पालन करावे. (प्रत सलग्न)

९. राज्य निवडणूक आयोगाच्या परिपत्रक क्र मनपा-२००४/प्र.क्र. ३५/का-५, दि. १/१२/२००४ नुसार निवडणूकीत झालेल्या सर्व महत्वाच्या घटना अथवा गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला ताबडतोब कळविण्याची दक्षता घ्यावी. (प्रत सलग्न)

१०. ज्या रिक्त जागेसंदर्भात कोणत्याही न्यायालयांत याचिका प्रलंबित असेल तथापि, स्थगिती आदेश नसेल अशा रिक्त जागांच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करताना सदर पोटनिवडणुका न्यायालयांत प्रलंबित असलेल्या याचिकांच्या निकालाच्या अधीन राहून घेण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी यांनी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करताना त्यामध्ये स्पष्टपणे नमूद करावे.

११. या पत्रान्वये कळविण्यात आलेल्या कोणत्याही जागेच्या पोटनिवडणुकीबाबत न्यायालयाचे स्थगिती आदेश किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे आदेश प्राप्त झाल्यास त्याची अंमलबजावणी लगेच करण्यात यावी व राज्य निवडणूक आयोगासही तसे फॅक्सद्वारे कळविण्यात यावे. दिनांक- १५/०९/२००५ पर्यंत रिक्त होणा-या जागा राज्य निवडणूक आयोगास तात्काळ फॅक्सद्वारे कळविण्यात याव्यात, जेणेकरुन त्या रिक्त जागांचाही निवडणूक कार्यक्रम या पत्रासोबत दिलेल्या कार्यक्रमानुसार लावणे शक्य होईल.

१२. निवडणूकांची सर्व कामे व्यवस्थित पार पडतील याची सर्व संबंधितांनी काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामध्ये काही हयगय झाल्यास राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/ग्रापनि/२००५/प्र.क्र.२२/का-८, दिनांक ६/८/२००५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे शिस्त भंग विषयक कारवाई करण्यात येईल. हे परिपत्रक सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचय निदर्शनास आणून दयावे.

१३. जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिनियम व निवडणूक नियमांमधील तरतुदीनुसार निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रसिध्द करावा. निवडणुका मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्थेसह आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यात यावी. निवडणुकीतील टप्पे राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या तारखेस पार पाडावेत व प्रत्येक टप्पा पार पाडल्यानंतर त्याबाबत राज्य निवडणूक आयोगास फॅक्सद्वारे/दूरध्वनीद्वारे अवगत करण्यात यावे. (फॅक्स क्रमांक- २२८४ ६७ १९/ २२०४ ६९ ०९ व दुरध्वनी क्रमांक- २२८७ ६२ २६ )

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**( चाँद गोयल )**
**प्रधान सचिव,**
**राज्य निवडणूक आयोग**

प्रतः-

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२

कृ.म.प.

त्यांना कळविण्यात येते की जिल्हाधिकारी यांच्या मागणीनुसार त्यांना निवडणूक विषयी व इतर साहित्य कृपया पुरविण्यात यावे.

४. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

५. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

६. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

त्यांना कळविण्यात येते की निवडणूका घेणेबाबत आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीनुसार त्यांना कृपया मंजूर करावे.

७. विभागीय आयुक्त, कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

८. संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४

त्यांना कळविण्यात येते की निवडणूकांच्या अनुशंगाने संबंधित जिल्हाधिका-यांना आवश्यक साधन सामुग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहीत वेळेत पुर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.

९. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई

१०. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

११. निवड नस्ती (कार्या-०७)

सहपत्रे :-१)अनुसूचि - १,२ व ३

२)राज्य निवडणूक आयोग अधिसुचना क्र. रानिआ/मनपा २००५/प्र.क्र.३/का-५ दि. २४ ऑगस्ट, २००५

| राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ २००५/प्र.क्र.३४/का-०७ दिनांक- ०५/०९/२००५ सोबतची अनुसूचि १ व २ | | | | |
|---|---|---|---|---|
| **अनुसूची-१** | | | | |
| **जिल्हा परिषद रिक्त पदांची माहिती** | | | | |
| **अ.क्र** | **जि.प. चे नाव** | **तालूका** | **गट क्रमांक. व नांव** | **पद रिक्त झालेल्या सदस्याचं नाव** |
| १ | रायगड | पनवेल | ५१-काळुंद्रे | श्री. भरत आंबे म्हात्रे |
| २ | रायगड | खालापूर | ५८-कुंभिवली | श्री. गोविद शिवराम बैलमारे |
| ३ | रत्नागिरी | दापोली | ४३-हर्णे | श्रीमती. ननुशा दामू पवार |
| ४ | जळगांव | चोपडा | २३-अडावद/धानोरा | श्रीमती. आशाबाई भिकाजी सोनवणे |
| ५ | अहमदनगर | श्रीगोंदा | ११-येलपणे | श्री. बाबासाहेब सुखदेव ढवळे |
| ६ | सोलापूर | माळशीरस | २५-अकलूज | श्री. नामदेव बाळा गायकवाड |
| ७ | औरंगाबाद | सिल्लोड | ३४- भवन | श्री. सुखदेव गिरजुबा खोडके |
| ८ | बीड | पाटोदा | १०-पाटोदा | श्री. घुमरे शामराव सोनाजीराव |
| ९ | नांदेड | बिलोली | ५४-सागरोळी | श्रीमती. रुक्मिनबाई रामचंद्र समन |
| १० | अकोला | तेल्हारा | १४-दानापूर | श्रीमती. इंदिराबाई विजयकुमार ढाकरे |
| **अनुसूची-२** | | | | |
| **पंचायत समिती रिक्त पदांची माहिती** | | | | |
| **अ.क्र** | **जिल्हा** | **पं.स चे नाव** | **गण क्रमांक. व नांव** | **पद रिक्त झालेल्या सदस्याचं नाव** |
| १ | ठाणे | पालघर | ७५-मनोर | श्रीमती. मनिषा सखाराम गडग |
| २ | रायगड | माणगांव | ३४-निजामपूर | श्री. आप्पा राजाराम म्हामूणकर |
| ३ | रायगड | उरण | ७९-चाणजे | श्री. नितीन शंकर कोळी |
| ४ | अहमदनगर | श्रीरामपूर | ८९-बेलापूर | श्री. अरुण गूलाबराव नाईक |
| ५ | औरंगाबाद | कन्नड | ४३-पिशोर | श्री. मोकासे नारायण काळू |
| ६ | नांदेड | धर्माबाद | १००-मांगनाजी | श्री. वारले नागोराव इरवंता |
| ७ | यवतमाळ | झरीजामणी | १११-कोसारा | श्री. मारस्कोल्हे वामन मलकजी |
| ८ | चंद्रपूर | गोंडपिंपरी | ११६-विठ्ठलवाडा | श्री. मनोहरलाल रघुनाथजी पावडे |
| ९ | गडचिरोली | आरमोरी | ६०-मानापूर | श्री. भजन जग्गुजी मडकाम |

<u>अनुसूचि-३</u>

**जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सदस्यांच्या रिक्त पादांच्या निवडणुकींचा कार्यक्रम २००५**
**(राज्य निवडणूक अयोगाचे पत्र क्र. रानिआ जिपपंस/पोनि/२००५/प्रक्र. ३४ /का-७,**
**दिनांक ०५/०९/२००५सोबतचे सहपत्र )**
**मतदार यादी ग्राहय धरण्याचा दिनांक शुक्रवार,०९ सप्टेंबर, २००५**

| | | |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (महा. पाच चा १९६२) चे कलम-१३, उपकलम (१ ए ) कलम ९ अ व कलम ५८, उपकलम क ९ अ (१ ए) अन्वये **गट व गण मतदार यादी प्रारुप स्वरुपात प्रसिध्द करण्याबाबत सूचना प्रसिध्द करणे**. | शुक्रवार,१६ सप्टेंबर, २००५ |
| १अ. | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (महा. पाच चा १९६२) चे कलम-१३, उपकलम (१ ए ) कलम ९ अ व कलम ५८, उपकलम क ९ अ (१ ए) अन्वये **गट व गण मतदार यादी अंतिम स्वरुपात प्रसिध्द करण्याबाबत सूचना प्रसिध्द करणे**. | शुक्रवार,२३ सप्टेंबर, २००५ |
| २. | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ९ अ महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणुका घेणे) नियम- १९६२ चा नियम ११, १२ अन्वये महाराष्ट्र पंचायत समित्या (मतदार गट व निवडणुका घेणे ) नियम-१९६२ चा नियम १३ अन्वये **निवडणुकीच्या तारखांची सूचना व निवडणुकांचा कार्यक्रम जिल्हाधिका-यांनी प्रसिध्द करण्याचा दिनांक.** | सोमवार ३ ऑक्टोंबर, २००५ |
| ३. | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम,१९६१ चे कलम ९अ महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणूका घेणे) नियम- १९६२ चा नियम ११, १२ आणि महाराष्ट्र पंचायत समिती नियम- १९६२ चा नियम १३ अन्वये **उमेद्वाराचे नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याची तारीख.** | सोमवार ३ ऑक्टोंबर, २००५ (सकाळी ११ ते दु. ३ ) |
| ४. | महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणुका घेणे) नियम- १९६२ चा नियम ११(अ) १२(१) अन्वये आणि महाराष्ट्र पंचायत समिती नियम- १९६२ चा नियम १३ (अ)अन्वये **नामनिर्देशन स्वीकारण्याची शेवटची तारीख.** | शनिवार ८ ऑक्टोंबर, २००५ (सकाळी ११ ते दु. ३ ) |
| ५. | महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणुका घेणे) नियम- १९६२ चा नियम ११ (१) (ब) अन्वये आणि महाराष्ट्र पंचायत समिती नियम १३ (१) (ब)अन्वये **नामनिर्देशनाची छाननी व त्यावर निर्णय देणे**. | सोमवार १० ऑक्टोंबर, २००५ ( सकाळी ११ वाजल्यापासून ) |
| ६. | महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणूका | |

घेणे) नियम -१९६२ चा नियम २० अन्वये आणि महाराष्ट्र पंचायत समिती नियम- १९६२ चा नियम १९ अ अन्वये
**नामनिर्देशन स्वीकारणे/अस्वीकारणे यावर जिल्हा न्यायाधीशाकडे अपिल करण्याची शेवटची तारीख.** — गुरुवार १३ ऑक्टोंबर, २००५

७. महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणुका घेणे) नियम- १९६२ नियम २०(५) व पंचायत समित्या नियम १९अ(५) अन्वये
**जिल्हा न्यायाधीशांनी अपिलावर निकाल देण्याची संभावित शेवटची तारीख.** — सोमवार १७ ऑक्टोंबर,२००५

८. महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणुका घेणे) नियम- १९६२, चा २० चा (८) अन्वये व महाराष्ट्र पंचायत समिती नियम- १९६२ चा नियम-१९ अ चा (८)अन्वये
**वैध उमेद्वारांची यादी प्रसिध्द करणे (जिथे अपिल नाही तेथे)** — सोमवार १० ऑक्टोंबर, २००५

९. महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणुका घेणे) नियम- १९६२, चा २० (८) अन्वये व महाराष्ट्र पंचायत समिती नियम- १९६२ चा नियम-१९ (ए)(८) अन्वये
**जिल्हा न्यायाधीशांनी अपिल निकालात काढल्यावर वैध उमेद्वारांची यादी प्रसिध्द करणे.** — सोमवार १७ ऑक्टोंबर, २००५

१०. **नामनिर्देशनपत्र मागे घेणे --**

(अ) महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणुका घेणे) नियम- १९६२ चा नियम २१ चा (१) (ए) अन्वये व महाराष्ट्र पंचायत समिती नियम, १९६२ चा नियम २० अन्वये
**(जेथे अपिल नाही तेथे)** — मंगळवार ११ ऑक्टोंबर,२००५ (सकाळी ११ ते दु. ३ )

(ब) महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणुका घेणे) नियम- १९६२ चा नियम २० चा (१)(अ) अन्वये व पंचायत समिती नियम, १९६२ चा नियम १९(अ) अन्वये
**(जेथे अपिल आहे तेथे)** — मंगळवार १८ ऑक्टोंबर, २००५

११. **निवडणुका लढविणा-या उमेद्वारांची यादी प्रसिध्द करणे व निशाणी वाटप --**

(अ) महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणुका घेणे) नियम- १९६२ चा नियम २२ आणि महाराष्ट्र पंचायत समिती, १९६२ चा नियम २३ अन्वये
**(जेथे अपिल नाही तेथे)** — मंगळवार ११ ऑक्टोंबर, २००५ (दुपारी ३.०० वाजल्यानंतर)

(ब) महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणुका घेणे) नियम- १९६२ चा नियम २२ व २३ आणि महाराष्ट्र पंचायत समिती, १९६२ चा नियम २२ अन्वये
**(जेथे अपिल आहे तेथे)** — मंगळवार १८ ऑक्टोंबर,२००५

(दुपारी ३.०० वाजल्यानंतर)

१२. महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणुका घेणे) नियम- १९६२ चा नियम ११ (१) (क) अन्वये आणि महाराष्ट्र पंचायत समिती नियम- १९६२ चा नियम १३ अन्वये **निवडणुकीची तारीख** — रविवार २३ ऑक्टोंबर, २००५ (सकाळी ७.३०ते सायं.५.३०)

१३. महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणूका घेणे) नियम- १९६२ चा नियम ११ (१) (ड) आणि महाराष्ट्र पंचायत समिती नियम- १९६२ चा नियम ५७-ए अन्वये **मतमोजणीची तारीख** — मंगळवार २५ ऑक्टोंबर, २००५ (सकाळी ९ वाजल्यापासून)

१४. महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार संघाचे विभाजन व निवडणूका घेणे) नियम- १९६२ चा नियम ११ (१) (ड) अन्वये महाराष्ट्र पंचायत समिती नियम- १९६२ चा नियम ५२ ते ५६ अन्वये **निवडून आलेल्या सदस्यांची नांवे प्रसिध्द करणे.** — गुरुवार २७ ऑक्टोंबर, २००५

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र